## २) जागतीक बँक सहाय्यीत - महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्प (MACP)

१. महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पाचा प्रमुख उद्देश राज्यातील शेतीची उत्पादकता वाढविणे, शेतकऱ्याच्या शेतमालास किफायतशिर भाव मिळवुन देणे व त्यांचा बाजार पेठामधील सहभाग वाढविणे हा आहे.

२. हा प्रकल्प एकुण ७०३.९५ कोटीचा असुन त्यामध्ये जागतिक बँकेचा हिस्सा ४६१.२१ कोटी, महाराष्ट्र शासनाचा हिस्सा ५१.७२ कोटी व प्रकल्पाचा लाभ घेणाऱ्या लाभार्थी संस्थाचा हिस्सा १९१.०२ कोटी आहे.

घटक निहाय जागतिक बँकेच्या आर्थिक सहभागाचा तपशीलखालील प्रमाणे:

(रक्कम कोटीत)

| घटक | जागतिक बँक हिस्सा | महाराष्ट्र शासन हिस्सा | लाभार्थी संस्था हिस्सा | एकूण किंमत | मार्च २०१३ पर्यंत झालेला खर्च | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| अ) बाजारपेठ मागणीधारित शेतमाल उत्पादनास चालना देणे | १३४.१९ | १४.९१ | - | १४९.१० | २३.४४ | १५.७ |
| ब) शेतकऱ्याचा बाजार पेठेतील सहभाग वाढविणे | | | | | | |
| ब.१) पर्यायी बाजार साखळी निर्माण करणे | १४२.२९ | १५.८१ | १८.१५ | १७६.२५ | २०.५० | ११.६ |
| ब.२) कृषि उत्पन्न बाजार समित्या व आठवडी बाजाराचे आधुनिकीकरण | १२९.०० | १४.३३ | १७२.८७ | ३१६.२० | १३.९२ | ४.४ |
| क) प्रकल्प व्यवस्थापन | ५५.७३ | ६.६७ | - | ६२.४० | १६.२७ | २६.१ |
| **एकूण** | **४६१.२१** | **५१.७२** | **१९१.०२** | **७०३.९५** | **७४.१४** | **१०.५** |

३. प्रकल्प आराखड्या मध्येबाजारव्यवस्थे संबंधीच्या कायद्यांमध्येसुधारणा व कृषी व पणन विस्तार सेवा मध्येसुधारणा व बळकटीकरण या दोन्ही बाबींचा समावेश आहे. त्यामध्ये कृषी उत्पन्न बाजार समिती कायद्यांमधीलसुधारणा यांचाही समावेश आहे. शासनाच्या दि. ३०.०७.२०१० रोजीच्या अधिसुचनेनुसारपणन संचालक व कार्यकारीसंचालक यांच्या जबाबदाऱ्या स्वतंत्र केल्या आहेत. त्याचप्रमाणे दि. २२.०६.२०१० च्या अधिसूचनेनुसार खाजगी बाजार उभारणीसाठीच्या किमान अंतराची अट काढून टाकण्यात आली आहे. पणन संचालकांच्या कार्यालयाच्या बळकटीकरणाच्यादृष्टीने त्याच्या कार्यालयामध्ये संगणक व अन्य साहित्य उपलब्ध करुन देण्यात आले आहे. राज्यातील सर्व बाजार समित्या आदर्श नियमावली (मॉडेल ऍक्ट) चा स्विकार करतील याबाबतची दक्षता घेण्यात आली आहे.

त्याचबरोबर महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार नियमीत केलेल्या धान्यांची (वस्तू) संख्या कमी करण्याबाबत शेतकरी व अन्य संबंधितांकडूनसूचना मागविण्यात आल्या आहेत.

४. प्रकल्पाच्या वतीने वरील दोन्ही बाबींच्यादृष्टीने सुधारणा करण्याच्या दृष्टीने खाजगी बाजारांची उभारणी, शेतमालाची थेट विक्री, एकक लायसेन्स देणे, करार शेती यादृष्टीने पावले उचलली आहेत. तसेच बाजार समितीच्या स्तरावर मॉडेल ऍक्टचा स्विकार करणे, खुल्या लिलाव पध्दतीचा अवलंब करणे, प्रमाणित लेखा पध्दतीचा अंवलंब करणे यादृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. प्रकल्पातर्फे बाजार समित्यांमधेयसंगणकीय विक्री व्यवस्था, ई-ऑक्शनहॉल, ई-स्पॉट मार्केट व आभासी बाजार यासारख्या उपाययोजना केल्या जात असूनबाजार समित्यांचे कामकाज प्रभावी व पारदर्शक होण्यासाठी त्याची मदत होणार आहे.

५. जिल्हास्तरीय आत्मा, तालुका स्तरावरील शेतकरी माहिती व सल्ला केंद्र व राज्यातील निवडक प्रशिक्षण संस्थांच्या बळकटीकरणातून कृषी तंत्रज्ञान व बाजारपेठांशी जोडणी यासाठीचे प्रयत्न केले जात आहेत. या संस्थांच्या सहाय्याने प्रकल्पामध्ये समाविष्ट जिल्ह्यातील शेतकरी, संलग्न शासन विभागाचे अधिकारी, व प्रकल्प अंमलबजावणीशी संबंधीत अधिकारी व पदाधिकारी यांचे प्रशिक्षण व कार्यशाळांचे आयोजन मोठ्या प्रमाणात केले जाते.

६. पहिल्या व दुसऱ्या टप्प्यातील जिल्ह्यांसाठीपणनकृती आराखडातयार करणे, खरेदीदार व विक्रेत्यांचे मेळावे आयोजित करणे, विविध प्रशिक्षण व कार्यशाळांसाठी प्रशिक्षण मार्गदर्शिकातयार करणे, तसेच नियोजनानुसार प्रशिक्षण व कार्यशाळांचे आयोजन करणे, पीक प्रात्यक्षिकांचे आयोजन करणे, शेतकऱ्यांसाठी राज्यांतर्गत व राज्याबाहेर अभ्यास दौऱ्यांचे आयोजन करणे इ. उपक्रम राबविले आहेत. प्रकल्पातील उपघटकांचा लाभ गाव स्तरावरील शेतकऱ्यांना होणे महत्वाचे असल्याने गावागावात शेतमाल उत्पादनानुसार शेतकऱ्यांचे गट व उत्पादकसंघांची स्थापना करुन त्याना गाव व गाव समुह स्तरावर कृषी व पणन विषयक सुविधा निर्माण करुन दिल्या जात आहेत. त्यासाठी तज्ञ व अनुभवी सेवा पुरवठादार संस्थांची निवड केली आहे.

७. कृषी व्यवसाय निर्मिती सुविधा ही राज्यस्तरावर स्वतंत्र व्यवस्था निर्माण करण्यासाठी सेवा पुरवठादार संस्थेची निवड केली आहे. या संस्थेने पुणे येथे प्रमुख कार्यालय आणि औरंगाबादव अमरावदती येथे क्षेत्रीय कार्यालये सुरु केली आहेत. या संस्थेने शेतकरी व शेतकरी गट यांचे व्यवसायासाठी बँकांना सादर करण्यासाठीचे प्रस्ताव तयार करण्याचे कामहाती घेतले असून एकूण १९२ प्रस्ताव विविध बँकांना सादर केले आहेत. त्याचबरोबर ही संस्था संलग्न शासन विभागातील अधिकाऱ्यांचे प्रशिक्षणांचे आयोजन करणार असून प्रकल्पातील कृषी पणन तज्ञ व आत्माच्या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे. तसेच प्रकल्पांतर्गत निवडलेल्या बाजार समित्यांचेसंचालक व ग्रामपंचायतींच्या सदस्यांचे प्रशिक्षणाचे कामहाती घेतले आहे. या संस्थेच्या सहाय्याने विविध अभ्यास हाती घेतले जाणार असून ४ अभ्यास हाती घेण्यासाठी सल्लागार नेमणूकीसाठीची प्रक्रिया सुरु आहे.

८. प्रकल्पांतर्गत पर्यायी बाजार व्यवस्था निर्माण करण्यासाठी काही उपक्रमहाती घेतले असून त्यामध्ये शेतकऱ्यांचा माल गोदामांमध्ये साठविला जावून त्यावर गोदाम पावती योजनेचा लाभ मिळवून देणे, शेतकरीसामुहिक सेवा केंद्रांची उभारणी करणे, आठवडी बाजारांमध्येसुधारणा करणे यासारखे उपक्रम राबविले जात आहेत. पहिल्या टप्प्यातील १० जिल्ह्यांमधील १०० नियोजीत आठवडी बाजारांपैकी ५१

आठवडी बाजारांमधील बांधकामे पूर्ण झाली असून ३८ मध्ये सुरु आहेत व ११ साठी अंमलबजावणी आराखडातयार करण्याचे काम सुरु आहे. दुसऱ्या टप्प्यातील जिल्ह्यांमधील निवडलेल्या ९४ आठवडी बाजारांपैकी १६ बाजारांमध्ये बांधकाम सुरु आहे, ४ बाजारांचे टेंडरचे काम सुरु आहे व ७४ बाजारांचा अंमलबजावणी आराखडातयार करण्याचे कामहाती घेतले आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या १५ गोदामांच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून २ गोदामांचे काम प्रगतीपथावर आहे. या गोदामांमध्ये आधुनिक प्रयोगशाळांची सुरुवात करावयाची असून १७ गोदामांमध्ये प्रयोगशाळांची स्थापना करण्यात आली आहे. दुसऱ्या टप्प्यामधीन निवडलेल्या २३ गोदामांमध्येप्रयोगशाळांचेकाम प्रगतीपथावर आहे. शेतकऱ्यांचे उत्पादक संघ व शेतकरीसामुहिक सेवा केंद्रांच्या उभारणीसाठी पहिल्या टप्प्यातील १० जिल्ह्यांपैकी ६ जिल्ह्यांमध्ये सेवा पुरवठादार संस्थांची नेमणूक केली असूनत्यांचे काम सुरु आहे व ४ जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांचे गट स्थापन करण्यासाठी देखील सेवा पुरवठादार संस्थेची निवड प्रकल्प अंमलबजावणी कक्ष-कृषी यांच्या वतीने करण्यात आली आहे. त्याचप्रकारे दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्यातीलएकंदर२३ जिल्ह्यांमध्ये शेतकरी गट स्थापना कामासाठी देखील सेवा पुरवठादार संस्था नेमणूकीचे कामहाती घेतले आहे.

९. घाऊक बाजाराची क्षमता वाढून एकंदर त्यांच्या आर्थिक उलाढालीमध्ये वाढ व्हावी व शेतकऱ्यांना प्रभावीरित्या सेवा उपलब्ध व्हाव्यात यादृष्टीने प्रकल्पांतर्गत बाजार समित्यांचे व जनावरांच्या बाजारांचे आधुनिकीकरण केले जाते. त्यादृष्टीने बाजार समित्यांच्या संचालकांसाठी कार्यशाळांचे आयोजन केले जाते. तसेच त्यांच्यासाठीराज्याबाहेरील (कर्नाटक) अभ्यास दौऱ्यांचे आयोजन केले जात आहे. बाजार व्यवस्थापन व अंमलबजावणी आराखड्याचे काम प्रभावी व्हावे यासाठी वरील उपक्रमांबरोबरच राष्ट्रीय कृषी पश्चात तंत्रज्ञान प्रशिक्षण संस्था, तळेगाव येथे कार्यशाळांचे आयोजन केले जाते.

१०. पहिल्या टप्प्यातील जिल्ह्यांतील १३ बाजार समित्या व ५ जनावरांच्या बाजारांमधील काम सुरु असून ९ बाजार समित्यांसाठी टेंडर्स काढले जात आहेत, तसेच ४ बाजार समित्यांचा अंमलबजावणी आराखडातयार केला जात आहे. तसेच दुसऱ्या टप्प्यातील १० बाजार समित्या व २ जनावरांच्या बाजारांसाठी अंमलबजावणी आराखडातयार केला जात असून सेवा पुरवठादार संस्थांच्या सहाय्याने २३ बाजार समित्या व ४ जनावरांच्या बाजारांसाठी अंमलबजावणी आराखडातयार करण्याचे काम सुरु आहे.

११. प्रकल्पाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने प्रकल्पाच्या प्रगतीचे संनियंत्रण, पर्यावरण व सामाजिक व्यवस्थापन उपाययोजनांची अंमलबजावणी, प्रकल्प निधीचे संनियंत्रण व तक्रार निवारण यंत्रणा कार्यरत आहेत. त्यादृष्टीने प्रकल्प अंमलबजावणीशी संबंधीत सर्व अधिकारी व संलग्न शासन विभागाचे विविध स्तरावरील अधिकारी यांना मार्गदर्शकसूचना निगर्मीत केल्या आहेत. याशिवाय संलग्न शासन विभागाकडून वेळोवेळी मार्गदर्शकसूचना दिल्या जातात.

१२. जागतिक बँकेच्या प्रोजेक्ट अप्रायजल डाक्युमेंट नुसार जुन २०१३ अखेरनियोजीत खर्चाच्या लक्षांकानुसार प्रक्रल्पाने ९१.७% निधीमार्च २०१३ अखेर वितरीत केला आहे.